क्र. EAU/ICD/2021-22/424
23/2/2022

# मुंबई विद्यापीठ

क्र.११/२०२१-२२

मसुदा गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२१-२२ मधील ८ फेब्रुवारी, २०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची आकरावी सभा मंगळवार **दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोजित करण्यात आली. कोरोना विषाणूंच्या संक्रमणामुळे खबरदारीचा उपाय म्हणून ही सभा आभासी पध्दतीने घेण्यात आली. बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य |
| ३. | प्रा. राजेश खरात | सदस्य |
| ४. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य |
| ५. | प्रा. अजय भामरे | सदस्य |
| ६. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ७. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ८. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ९. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| १०. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| ११. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १२. | श्री. सुधीर पुराणिक (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १३. | डॉ. विनोद पाटील (संचालक,परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १४. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➢ **स्वागत :-** सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

➢ **श्रध्दांजली :-**

**ज्येष्ठ पत्रकार व संपादक दिनकर रायकर**

ज्येष्ठ पत्रकार व संपादक दिनकर रायकर यांचे दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ७९ वर्षांचे होते.

**गायिका-अभिनेत्री किर्ती शिलेदार**

ज्येष्ठ गायिका-अभिनेत्री किर्ती शिलेदार यांचे दिनांक २२ जानेवारी, २०२२ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्युसमयी त्या ६९ वर्षांच्या होत्या.

**डॉ. अनिल अवचट**

ज्येष्ठ लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट यांचे दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ७८ वर्षांचे होते.

**श्रीमती अरुणा बोरगावकर**

ज्येष्ठ चित्रपट निर्मात्या श्रीमती अरुणा बोरगावकर यांचे दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ७४ वर्षांच्या होत्या.

**पं. मुकुंदराज गोडबोले**

ज्येष्ठ गायक पं. मुकुंदराज गोडबोले यांचे दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२२ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्युसमयी ते ७७ वर्षांचे होते.

**श्री. रमेश देव**

ज्येष्ठ मराठी व हिंदी अभिनेते श्री. रमेश देव यांचे दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२२ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्युसमयी ते ९३ वर्षांचे होते.

**श्री. गजानन बाबर**

शिवसेनेचे माजी खासदार श्री. गजानन बाबर यांचे दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२२ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ७८ वर्षांचे होते.

## श्रीमती संजिवनी रायकर

राज्य शिक्षक परिषदेच्या कार्याध्यक्षा आणि माजी शिक्षक आमदार श्रीमती संजिवनी रायकर यांचे दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२२ रोजी वृध्दपकाळाने निधन झाले. मृत्युसमयी ते ८७ वर्षांच्या होत्या.

## भारतरत्न लता मंगेशकर

गानकोकीळा भारतरत्न लता मंगेशकर यांचे दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२२ रोजी दिर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्या ९३ वर्षांच्या होत्या.

| अनुक्रमांक | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | एस.एस.टी. महाविद्यालय, उल्हासनगर संबंधित दाखल झालेल्या तक्रारीची चौकशी करण्याकरिता. | संलग्नता व मान्यता विभाग |
| ठराव | सविस्तर व सखोल चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, एस.एस. टी. महाविद्यालय, उल्हासनगर यांच्यावर आणि गैरप्रकार केलेल्या सर्व विद्यार्थ्यांवर तात्काळ एफ.आय.आर. दाखल करावा, या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करावे व त्यांचे अंतिम परीक्षा निकालपत्र रद्दबादल करावे. तसेच महाविद्यालयाचे असंलग्निकरण करणेबाबत तात्काळ कायदेशीर सल्ला घेण्यात यावा व तद्नंतर असंलग्निकरणची प्रक्रिया त्वरेने सुरू करावी. | |
| बाब क्र. २ | साधना एज्यूकेशन सोसायटी, साधना कॉलेज ऑफ एज्यूकेशन (बी.एड्), अंबाडी नाका रोड, खरिवली, ता. भिवंडी, (प.), ठाणे -४२१ ३१२ या महाविद्यालयाविरोधात श्री. राम नवल जगन्नाथ शर्मा, अध्यक्ष क्रांतिकारी पत्रकार संघटना, ठाणे यांच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१८ रोजीच्या तक्रारीबाबत. | संलग्नता व मान्यता विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, महाविद्यालयाने विद्यापीठास जे केवळ खुलाशाचे पत्र दिलेले आहे त्यासोबत कोणतीही कागदपत्रे जोडलेली नसल्याने सर्व संबंधित कागदपत्रे महाविद्यालयाकडून त्वरेने मागवून घ्यावीत. त्याचवेळी सदर तक्रारीवर कार्यवाही करण्याचे पत्र NCTE कडून प्राप्त झाल्याने NCTE ला विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीबाबत कळविण्यात यावे व महाविद्यालयाकडून आवश्यक संबंधित कागदपत्रे विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर सदर बाब पुन:श्च व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात यावी. | |
| बाब क्र. ३ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील कलम १०४ (ग) नुसार व्यवस्थापन परिषदेने दोन तज्ज्ञ (जे त्यांच्या अधिकारतेखाली विद्यापीठाशी, महाविद्यालयांशी किंवा परिसंस्थाशी संबंधित नाहीत) यांचे संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य किंवा विद्यापीठाद्वारे चालविण्यात येणाऱ्या विद्यापीठ परिसंस्था किंवा पदव्युत्तर केंद्रे किंवा उपपरिसर यांचे संचालक किंवा प्रमुख यांची निवड करणाऱ्या निवड समितीमध्ये नामनिर्देशन करण्याबाबत. | AAQA |
| ठराव | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील कलम १०४ (ग) नुसार व्यवस्थापन परिषदेने दोन तज्ज्ञ (जे त्यांच्या अधिकारतेखाली विद्यापीठाशी, महाविद्यालयांशी किंवा परिसंस्थाशी संबंधित नाहीत) यांचे संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य किंवा विद्यापीठाद्वारे चालविण्यात येणाऱ्या विद्यापीठ परिसंस्था किंवा पदव्युत्तर केंद्रे किंवा उपपरिसर यांचे संचालक किंवा प्रमुख यांची निवड करणाऱ्या निवड समितीमध्ये नामनिर्देशन करण्याबाबतचे अधिकार व्यवस्थापन परिषदेने मा. कुलगुरूंना प्रदान केले.<br>डॉ. वैभव नरवडे यांनी सदर ठरावास आक्षेप नोंदविला. | |
| बाब क्र. ४ | मुंबई विद्यापीठ आणि एकमेसीएल यांच्यामध्ये डिसेंबर, २०१९ मध्ये झालेल्या कराराची मुदत १ ऑक्टोबर, २०२१ पासून वाढवून ३१ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत आवश्यक त्या सुधारणासहित नविन करार करणेबाबत. | प्रवेश, नोंदणी पात्रता आणि स्थलांतर |

| | | |
|---|---|---|
| ठराव | चर्चेअंती सर्वानुमते असे ठरविण्यात आले की, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांनी लवकरच MKCL बरोबर बैठक आयोजित करावी व त्या बैठकीस अधिसभा सदस्यांचे काही प्रतिनिधी, प्राचार्यांचे काही प्रतिनिधी इत्यादींना बोलवावे व MKCL च्या प्रतिनिधींबरोबर चर्चा करून MKCL ने महाविद्यालयांना येत असलेल्या अडचणी सोडवाव्यात व MKCL ने त्यांच्या कामकाजातील त्रुटी दुर कराव्यात आणि त्यानुसार त्यांच्याकडून हमीपत्र घेण्यात यावे. तसेच मुंबई विद्यापीठ आणि MKCL यांच्यामध्ये १ ऑक्टोबर, २०२१ पासून ३१ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत आवश्यक त्या सुधारणांसहीत करार करण्यास सर्वानुमते अनुमती देण्यात आली.<br>मा. कुलगुरूंनी निर्देशित केले की, या एक वर्षाच्या कालावधीत विद्यापीठाने तंत्रज्ञानाचा वापर करून स्वत:ची यंत्रणा विकसित करावी व पुढील वर्षापासून विद्यापीठाने सदर कामकाज स्वत: करावे. | |
| बाब क्र. ५ | Approval of Minutes of Building and Works Committee dated 2nd February, 2022 and to place item before Management Council. | IMPRD |
| ठराव | It was resolved that, the Minutes of Building and Works Committee meeting dated 2nd February, 2022 be accepted. | |
| | अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेले विषय | |
| | चर्चेच्या अनुषंगाने पारीत झालेले ठराव | |
| मुद्दा क्र. ६ चा ठराव | चर्चेच्या अनुषंगाने मा. कुलसचिवांनी सभागृहास अवगत केले की, विद्यानगरी परिसरातील वापरात नसलेली ५ एकर जागा चित्रपटाच्या चित्रिकरणासाठी देण्याबाबत प्राप्त झालेल्या मेसर्स सिध्देश एंटरप्रायजेस यांच्या विनंती पत्राच्या अनुषंगाने दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेत मान्यता देण्यात आली होती व तसेच त्याच सभेत मा. कुलगुरूंना दिलेल्या अधिकारानुसार धोरण ठरविण्यासाठी मा. कुलगुरूंनी प्राचार्य डॉ. महादाप्पा गोंडा, | GAD Vidyanagari |

| | | |
|---|---|---|
| | श्रीमती डॉ. कविता लघाटे व कुलसचिव यांची समिती गठीत केली होती. या अनुषंगाने मेसर्स सिध्देश एंटरप्रायजेस यांचेकडून दोन लाख रूपये प्रति एकरी या दराने ५ एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली असून पाचशे रूपयांच्या स्टॅम्प पेपरवर त्यांच्याकडून करारनामा करून घेतला आहे. सदर बाबीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच ज्या कालावधीसाठी विद्यापीठाने त्यांना जागा उपलब्ध करून दिलेली आहे त्या व्यतिरीक्त अधिक कालावधी त्यांना वाढवून देऊ नये असेही ठरले. | |
| मुद्दा क्र. ७ चा ठराव | श्री प्रदिप सावंत यांनी निदर्शनास आणून दिले की, मादाम कामा वसतिगृहाच्या तळमजल्याच्या जागेबाबत ज्या समितीचे गठन झाले होते त्या समितीच्या बैठका न झाल्याने त्या समितीचे पुर्नगठन करण्यात यावे. सदर बाब मान्य करण्यात येऊन समितीचे पुर्नगठन करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | पा. सु. नि. अं. व दे. विभाग |
| बाब क्र. ८ | मुंबई विद्यापीठात कार्यरत असणा-या हंगामी कर्मचा-यांच्या एकत्रित वेतनाबाबत मा. कुलगुरूंनी गठीत केलेल्या समितीचा अहवाल मान्येतसाठी सादर. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | मुंबई विद्यापीठात कार्यरत असणा-या हंगामी कर्मचा-यांच्या एकत्रित वेतनाबाबत मा. कुलगुरूंनी गठीत केलेल्या समितीचा एकत्रित वेतनात अंतरिम वाढ देणेबाबतचा अहवाल सभागृहात सादर केला असता समिती अध्यक्ष ॲड. निल हेळेकर यांनी सांगितले की, हंगामी कर्मचा-यांना एकत्रित वेतनामध्ये वाढ करताना विद्यापीठाच्या आर्थिक बाजूचा विचार करण्यात आला आहे. सर्वच हंगामी कर्मचा-यांना सरसकट ठराविक टक्के वेतनवाढ न देता ज्यांचा पगार कमी आहे त्यांना जास्तीतजास्त वेतनवाढ देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे जसे की,<br>ज्या हंगामी कर्मचा-यांचे एकत्रित मासिक वेतन रू.१३,०००/- ते रू.५०,०००/- च्या दरम्यान आहे त्यांच्या एकत्रित मासिक वेतनात ३ टक्के वाढ करण्यात यावी. | |

| | | |
|---|---|---|
| | ज्या हंगामी कर्मचा-यांचे एकत्रित मासिक वेतन रू.१०,०००/- ते रू.१२,९९९/-च्या दरम्यान आहे त्यांच्या एकत्रित मासिक वेतनात ५ टक्के वाढ करण्यात यावी.<br>ज्या हंगामी कर्मचा-यांचे एकत्रित मासिक वेतन रू.९,९९९/- पेक्षा कमी आहे त्यांच्या एकत्रित मासिक वेतनात २५ टक्के वाढ करून येणारे एकत्रित मासिक वेतन वा रू.११,०००/- जे जास्त असेल ते देण्यात यावे.<br>जे हंगामी कर्मचारी रोजंदारी तत्वावर प्रतिदिन रू.३५०/- वर कार्यरत आहेत त्यांना रू.४००/- प्रतिदिन देण्यात यावा.<br>हंगामी वादक/तालवाद्य/नृत्य/अभिनय/गायक शिक्षक या उच्च गुणवत्ताधारक असलेल्यांना दरमहा रू.२०००/- वाढ करण्यात यावी.<br>सदर अहवाल सर्वानुमते मंजूर करण्यात आला व हंगामी कर्मचा-यांच्या सदर एकत्रित वेतनातील वाढ दि. १ फेब्रुवारी, २०२२ पासून लागू करण्यात यावी असेही सर्वानुमते ठरले. | |
| मुद्दा क्र. ९ चा ठराव | स्वरसम्राज्ञी, भारतरत्न लता मंगेशकर यांच्या जागतिक स्तरावरील कामगिरीची दखल घेऊन त्यांना श्रध्दांजली म्हणून त्यांच्या स्मरणार्थ 'लता मंगेशकर सेंटर ऑफ एक्सलेंस इन लाईट म्युझिक' हे अभ्यास व संशोधन केंद्र मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागच्या अंतर्गत सुरू करण्याबाबत, संगीत विभागातील पदवी/पदव्यूत्तर परीक्षेत प्राविण्य संपादन करणा-या विद्यार्थ्यांस भारतरत्न लता मंगेशकर यांच्या नावे सुर्वणपदक देणेबाबत आणि भारतरत्न लता मंगेशकर यांच्या नावे अध्यासन सुरू करणेबाबतचा प्रस्ताव मा. कुलगुरूंनी सभागृहात मांडला. 'सेंटर ऑफ एक्सलेंस इन लाईट म्युझिक' या अभ्यास व संशोधन केंद्राच्या माध्यमातून विविध पदवी, पदविका, प्रमाणपत्र, अभ्यासक्रम आणि भारतरत्न लता मंगेशकर यांच्या Light music मधील योगदानावर जगभरातील विद्यार्थ्यांनी येथे येऊन संशोधन करावे, विद्यार्थ्यांसाठी Studio ची निर्मिती करावी असा मानस मा. कुलगुरूंनी व्यक्त केला.<br>सदर ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. तसेच असेही | |

| | | |
|---|---|---|
| | ठरले की, भारतरत्न लता मंगेशकर यांच्या नावे सुरू करावयाच्या अध्यासनासाठी लागणारा निधी CSR च्या माध्यमातून अथवा इतर स्त्रोतांमधून उभा करावा. तसेच या तीनही उपक्रमांसाठी ज्या ज्या स्तरावर मान्यता घ्याव्या लागतील त्या आधी प्राप्त करून मग ते सुरू करावेत. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सहायक कुलसचिव

उपकुलसचिव

कुलसचिव

प्र-कुलगुरू

**इतिवृत्त मंजूर**

कुलगुरू